**कार्यकारी अभियंता -स्थापत्य (गट-अ) संवर्गात अधिसंख्य (Ad-hoc) पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती / नेमणूका/ बदल्या**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१९/ २८९५ /प्र.७**
**दिनांक :- 13 OCT 2019**

**संदर्भ -** प्राधिकरणाचे आदेश क्र. प्राधि./अधिसंख्य/२०१६/२५२३/प्र.७ दि. ३०.०५.२०१६

## आ दे श

प्रशासकीय हित लक्षात घेऊन संदर्भिय आदेशान्वये मान्यता दिल्याप्रमाणे निर्मित कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील पदावर सदर आदेशात नमूद असलेल्या खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून **उपअभियंता (पदोन्नत पदवीधर) - स्थापत्य (गट-अ)** संवर्गातील खालील नमुद अभियंत्यांना **कार्यकारी अभियंता-स्थापत्य (गट-अ)** या संवर्गात रु.१५६००-३९१०० या वेतन बँडमधील ग्रेड पे रु.६६००/- या वेतन संरचनेत एतदर्थ, पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपात अधिसंख्य (Ad-hoc) पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | अभियंत्याचे नाव | सध्याचे कार्यालय | पदोन्नती नंतरचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. आर व्ही. क्षीरसागर | प्राधिकरण | कोंकण मंडळ | रिक्त पदी |

२/- सदर पदोन्नती ११ महीने किंवा प्रतिनियुक्तीबरील कार्यकारी अभियंत्याची सेवाप्रत्यावर्तन यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत कार्यरत राहील.

३/- सदर अधिसंख्य पदे अन्य विभागात प्रतिनियुक्तीमुळे कार्यकारी अभियंता संवर्गात रिक्त राहणाऱ्या पदांऐवजी निर्मित करण्यात आली आहेत. त्यामुळे संदर्भिय आदेशात नमूद क्रमाने पदोन्नती व प्रतिनियुक्तीची पदे कमी झाल्यास पदावनती करण्यात येईल.

४/- अधिकाऱ्यांची तात्पुरत्या एतदर्थ (Adhoc) पध्दतीनुसार पदोन्नतीने केलेल्या नेमणूकीमुळे असल्याने त्यांचा या संवर्गातील कायम पदावर कोणताही हक्क/धारणाधिकार राहणार नाही, या अटीवर करण्यात येत आहे.

५/- अधिसंख्य पदावरील पदोन्नत कार्यकारी अभियंत्याचा सदर पदावरील कालावधी कार्यकारी अभियंता संवर्गात ज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६/- अधिसंख्य पदाकरीता बिंदु नामावली लागु राहणार नाही.

७/- सदर पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या अभियंता पदावर रुजू न झाल्यास त्या गटातील ज्येष्ठतेने दुसऱ्या क्रमांकावरील अभियंत्याचा पदोन्नतीकरीता विचार करण्यात येईल.

८/- पदोन्नत होणाऱ्या अभियंत्यास पदोन्नतीपुर्वी वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

९/ संबधित पदोन्नत पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

१०/- शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक ]/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ ची दिनांक ०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

११/- संबधित पदोन्नत पदधारकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी पाहून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१२/- हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आंत पदोन्नत पदधारक यांनी नवीन नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिका-यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

**१३/- उपरोक्त अधिकाऱ्यांनी दि.३१/३/२०१९ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरीत करण्यात येऊ नयेत. तसेच आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा तसेच वर नमूद अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमी पत्र सादर केल्याबाबतचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.**

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

(प्रसाद उकर्डे )
सचिव / प्राधिकरण

**प्रति,**
श्री. आर.व्ही. क्षीरसागर, उपअभियंता/द व गु नियंत्रक कक्ष/प्रा.
**(मुख्य अभियंता-१/प्रा. यांचेमार्फत)**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१ मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२ मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि.व क्षे.वि.मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
३ मुख्य अभियंता/प्रा. (१/२/३)
४ वित्त नियंत्रक/प्रा.
५ उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
६ मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
७ मुख्य अधिकारी मुं.झो.सु.मं./कोंकण/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती मंडळ

**प्रत,**

१. मुख्य लेखाधिकारी/मुं.इ.दु. व पु. मंडळ/मुंबई मंडळ
२. लेखाधिकारी-१/प्रा./कोंकण मंडळ
३. प्रशासकीय अधिकारी-१,२/प्रा./कोंकण मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
प्रत - अध्यक्ष ,महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रत - प्रधान कार्यवाह ,मागासवर्गीय कर्मचारी संघटना
प्रत - अध्यक्ष,ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा,मुंबई.
प्रत - प्रशा-६/८/९/१०/११/१२/१३/१५/प्रा.